# पाऊस आणि सूर्य

१ ऑगस्ट, २०१८

आत्मीय वाचकांनो,

ऑगस्टच्या या महिन्यात मी पावसाचा विचार करते आहे — कशा प्रकारे श्री मुक्तानंद आश्रमाच्या वर जमा झालेल्या ढगांचा भार हलका करत पाऊस गेल्या अनेक दिवसांपासून स्वतःला मोकळा करतो आहे. पावसाची एक झडच लागून राहते — हा पाऊस कधी स्थिरतेने, तर कधी हवेच्या झोताप्रमाणे कोसळत राहतो; त्या-त्या दिवशी मेघांनी किती साठा करून ठेवला आहे, यानुसार पाऊस कधी काही मिनिटे पडतो तर कधी तासन्तास चालूच राहतो. तुम्ही पावसाच्या या ध्वनीवर ध्यान करू शकता; संकीर्तन करू शकता किंवा तुम्हाला कदाचित याच्या जलमय घड्यांमधून प्रसृत होणारी मंत्राची स्पंदने ऐकू येतील.

श्रीगुरुमाईंनी आपल्याला नेहमीच शिकवले आहे की, आपण पावसाला आशीर्वादाचे सूचक मानून त्याचे स्वागत करावे. म्हणून मी जेव्हा पाऊस पाहते, तेव्हा मला स्वतःला याचे स्मरण करवून द्यायला आवडते की, होय, या जगात भलेपणा, चांगुलपणा नक्कीच आहे आणि तो भरपूर आहे. होय, या जगात दिव्यता नक्कीच आहे; नवचैतन्याने भरून जाण्यासाठी व नूतनतेने आरंभ करण्यासाठी इथे सुसंधी निश्चितच आहेत; मुसळधार पावसाच्या ध्वनीच्या गाभ्यामध्ये खोलवर वसलेली आहे, गहन शांती आणि मखमली मौन.

या महिन्याचे सिद्धयोग मार्गावर आणि सिद्धयोगाच्या इतिहासात अत्यधिक महत्त्व आहे. चांद्र आणि सौर, या दोन्ही तिथींनुसार यावर्षी ८ ऑगस्टला भगवान नित्यानंदांची पुण्यतिथी आहे. त्यानंतर एका आठवड्याने, १५ ऑगस्टला बाबा मुक्तानंदांच्या दिव्य दीक्षा दिवसाची वर्षगाठ आहे. आणि मग पौर्णिमेला म्हणजेच २५ ऑगस्टला [भारतात आणि पूर्व गोलार्धातील अन्य भागांमध्ये २६ ऑगस्टला] आपण रक्षाबंधनाचा सण साजरा करणार आहोत.

भारतीय शास्त्रग्रंथ आपल्याला सांगतात की, महात्मा जेव्हा आपल्या भौतिक देहाचा त्याग करतात, तेव्हा *खरे पाहता* ते आपल्याला सोडून जात नाहीत. निर्वाणानंतर, या जगात ते त्या रूपात जरी वास्तव्य करत नाहीत ज्या रूपात त्यांनी आपले जीवन व्यतीत केलेले असते, तरीदेखील त्यांची शक्ती, त्यांची उपस्थिती, त्यांची कृपा आपल्या वातावरणात मिसळून त्याला प्रकाशमय बनवत राहते. एका

महान विभूतीच्या पुण्यतिथीच्या वेळी आपण याविषयीच विचार करतो, यावरच मनन-चिंतन करतो. हे समजण्याकरता आपण निरंतर पडणाऱ्या पावसाच्या उपमेची मदत घेऊ शकतो. पावसाने आपल्याला चहूबाजूंनी वेढलेले असते, सर्वत्र एक जलरूपी पडदा पसरलेला असतो. तथापि, आपण जेव्हा बारकाईने त्याकडे पाहतो, तेव्हा आपल्याला आढळून येते की, प्रत्येक थेंब चमचमतो आहे. पावसाच्या प्रत्येक कणात, अगदी लहानलहान थेंबांमध्येदेखील जणू एक जादू असते, त्यात मांगल्य आणि आशा यांची झलक असते.

बडे बाबा जन्मसिद्ध होते. आत्मज्ञानी रूपातच ते या पृथ्वीवर अवतरले होते; मानवरूपातील त्यांची उपस्थिती ही समस्त मानवजातीसाठी एक वरदान ठरली. त्यांच्याविषयी अगणित गोष्टी आहेत की, कशा प्रकारे त्यांच्या केवळ सान्निध्यात असण्यानेच लोकांची दुःखे दूर होत असत; त्यांचा भाग्योदय होत असे. लोकांना नव्याने किंवा आयुष्यात कदाचित पहिल्यांदाच समजत असे की, शांती काय असते. बडे बाबांच्या सान्निध्यात लोक त्यांच्या स्वतःच्या आत्म्याच्या संपर्कात येत असत.

म्हणून हा केवळ विचारच, आपल्याला विनम्रतेने, श्रद्धेने आणि आदराने भरून टाकतो की, बडे बाबांच्या महानिर्वाणामध्येही, त्यांच्या देहत्यागातही किती अपार करुणा होती. 'त्यांच्या महानिर्वाणातही अपार करुणा होती' असे म्हणण्याबरोबर आपण कदाचित असेही म्हणू शकतो की, त्यांच्या महानिर्वाणात विशेषतः अवर्णनीय उदारता निहित होती. हे आपले अहोभाग्यच आहे की, आपण आत्ता बडे बाबांच्या आशीर्वादांचे आवाहन करू शकत आहोत आणि सदासर्वकाळ करू शकणार आहोत.

तेव्हा, बडे बाबांची पुण्यतिथी ही एक उत्कृष्ट सुसंधी आहे व ती एक प्रेरणा आहे, 'थांबणे आणि स्वतःला जोडून घेणे' याचा अभ्यास करण्यासाठी — बडे बाबांच्या सान्निध्यात राहण्याचा स्वप्रयत्न करण्यासाठी; ते वास्तवात जे आहेत, त्या सत्याचा आपल्या हृदयात व आसपासच्या जगात अनुभव घेण्यासाठी. आपण जेव्हा तरंगणाऱ्या निळसर-काळ्या ढगांच्या पलीकडे असलेल्या आकाशात बडे बाबांचे स्वरूप ओळखतो, तेव्हा आपण निश्चितच त्यांच्याबरोबर सत्संग करत असतो. आपण जेव्हा त्यांच्या प्रतिमेवर एकाग्र होतो — कल्पना करा की ते ताठ बसलेले आहेत, एक पाय दुसऱ्या पायाच्या मांडीवर टेकवून ठेवलेला आहे, त्यांच्या आसनात एक भव्यता आहे, एक दिमाखदारपणा आहे — त्यांचा तो फोटो जुन्या काळचा का असेना, आपण जेव्हा त्यांच्या मुद्रेवर चित्त एकाग्र करतो, तेव्हा निःसंदेहपणे आपण त्यांच्याशी जोडलेले असतो. आपण 'नित्यानंद आरती' गाऊन जेव्हा त्यांचे महिमागान करतो, तेव्हा मराठी भाषेतील त्या कडव्यांचे माधुर्य त्या कणखर तटबंदीलादेखील विरघळून

टाकते, जी आपण स्वतःच आपल्या हृदयाभोवती उभारलेली असते, आणि तेव्हा आपल्याला अंतरात खोलवर सहजच हे माहित होते की, आपला आवाज अशा एखाद्या गोष्टीमध्ये मिसळून तिच्यामध्ये एकरूप होतो आहे, जी आपल्यापेक्षा कितीतरी महान आहे. आणि त्यांच्या स्वरूपावर गुरुमाईं द्वारे लिखित धारणेचा अभ्यास करताना हे पाहून आपल्याला आश्चर्य वाटू नये, की त्यांचे हास्य आपल्या हृदयात प्रतिबिंबित होते आहे; ते प्रतिबिंब इतके हुबेहूब असते की, यातील फरक सांगणे कठीण असते की 'कारण' काय आहे व 'परिणाम' कोणता आहे—असे जर घडत असेल, तर आपण खात्रीपूर्वक म्हणू शकतो की त्या क्षणी आपण परम सत्याशी समरस झालेले आहोत.

आपले पुस्तक 'गणेशपुरी निवासी भगवान नित्यानंद' यामध्ये बाबा मुक्तानंद अतिशय सुंदर रीतीने सांगतात की, जे लोक बडे बाबांवर प्रेम करतात आणि त्यांची आराधना करतात त्या सर्वांसाठी बडे बाबांच्या पुण्यतिथीचा काय अर्थ आहे. बाबा म्हणतात :

> श्रीगुरुदेव पूर्वी जसे होते, तसेच आजही आहेत. ते इथेच आहेत.
> ते परिपूर्ण होते आणि काळाच्या आरंभापासून ते अंतापर्यंत ते परिपूर्णच राहतील.[१]

* * *

आंतरिक संबंध, अनंतता, आंतरिक संबंधाची अनंतता — ऑगस्ट महिन्यात विविध पर्वे साजरी करत असताना गुरुमाईंच्या २०१८च्या संदेशाशी संबंधित असलेले हे सर्व विषय उद्भवत आहेत.

बाबा मुक्तानंद वर्णन करतात की, १५ ऑगस्ट, १९४७ रोजी भगवान नित्यानंदांकडून शक्तिपात दीक्षा प्राप्त झाल्यानंतर ते जेव्हा बाहेर आले, तेव्हा थोड्याच वेळात किंचित वरुणदेवाची कृपा झाली, झिमझिम पावसाच्या सरीचा हलकासा शिडकावा होऊ लागला. आपली आध्यात्मिक आत्मकथा 'चित्शक्ती विलास'मध्ये या दिवसाचे वर्णन करताना ते म्हणतात की, तो "मंगलानां च मंगलम्" दिवस होता.

बडे बाबांनी त्या दिवशी दिव्य कृपा केली; त्यांनी प्रदान केलेल्या या दीक्षेच्या परिणामस्वरूप एवढी पुण्ये संचित झाली, इतक्या कल्याणकारीतेची वर्षा झाली की, त्यामुळे स्वतः बाबांच्या साधनेचा आणि प्राप्तीचा विकास तर झालाच, पण त्याचबरोबर विश्वभरातील साधकांच्या पुढील अनेक पिढ्यांची साधनाही अग्रेसर झाली. बाबांनी हजारो लोकांना ही पावन दीक्षा प्रदान केली व एक शक्तिपात गुरू म्हणून त्यांची सर्वदूर ख्याती पसरली, याचे बीज त्याच मंगलमय घटनेमध्ये निहित आहे जी १५ ऑगस्टला घडली. याशिवाय, हा तो दिवस होता ज्याचे मांगल्य संपूर्ण विश्वात तितकेच प्रकट होताना

दिसत होते, जितके बाबांच्या जीवनामध्ये. हा तोच दिवस होता जेव्हा आंतरिक स्वातंत्र्य बाहेरही प्रतिबिंबित झाले होते, कारण त्याच दिवशी भारत देशाच्या स्वातंत्र्यासाठी केले गेलेले अनवरत व कठोर प्रयत्न अंततः फलीभूत झाले होते.

मला ज्ञानेश्वरीतील या ओवीचे स्मरण होते आहे जी बाबा व बडे बाबा, या दोघांचेही वर्णन करते; त्याचबरोबर ती अत्यंत यथार्थपणे हे विशद करते की, बाबांच्या दिव्य दीक्षेच्या फलस्वरूप मानवजातीचे किती व्यापक प्रमाणात कल्याण झाले. ज्ञानेश्वर महाराज म्हणतात :

जयजय वो शुद्धे। उदारे प्रसिद्धे।
अनवरत आनंदे। वर्षतिये॥

हे अनुग्रहकारिणी शक्ती, तुझा जयजयकार असो!
तू शुद्ध आहेस, तुझी उदारता प्रसिद्ध आहे
आणि तू अनवरतपणे आनंदाचा वर्षाव करत असतेस![२]

प्रत्येक वर्षी ऑगस्ट महिन्यात, बाबांच्या शक्तिपाताचा अनुभव, ज्याचे सविस्तर वर्णन त्यांनी 'चित्शक्ती विलास'मध्ये केले आहे, सिद्धयोग मार्गाच्या वेबसाइटवर प्रकाशित केला जातो. हा एक अतिशय सुंदर उतारा आहे; जो आपल्याला आकृष्ट करतो, जो आपल्याला साद घालतो की, आपण त्याचे वाचन करावे, पुन्हापुन्हा वाचन करावे आणि याचा शोध घ्यावा की, त्यामध्ये आपल्याला मनन करण्यासाठी तसेच मंत्रमुग्ध होण्यासारखे काय-काय आहे. माझ्याकरता कदाचित हा उतारा दुसऱ्या कोणत्याही गोष्टीपेक्षा अधिक महत्त्वाचा यासाठी आहे की, त्यातून बाबांचे माहात्म्य, त्यांची उदारता व्यक्त होते. शक्तिपात दीक्षा आपल्याला आपल्या स्वतःच्या मूळ स्वरूपाची झलक दाखवते. जीवनातील या अनमोल घटनेशी संबंधित असलेल्या आपल्या अनुभवाचे इतके सजीव, सुस्पष्ट व सविस्तर वर्णन करून बाबा आपल्याला त्या ध्येयाविषयी शिकवत आहेत ज्याची आपल्याला तीव्र उत्कंठा आहे आणि जे प्राप्त करण्यासाठी आपण प्रयत्नरत आहोत.

म्हणून, बाबांच्या शक्तिपाताच्या वर्णनाचा सारांश सांगणे हे न्यायोचित ठरणार नाही — तुम्हाला ते वर्णन स्वतः वाचावेच लागेल. तरीही, त्यामधील एका भागाकडे आता मी तुमचे लक्ष वेधू इच्छिते.

बाबा आपल्या वर्णनात 'अनेकात एक' या भावाच्या अनुभूतीविषयी सांगतात, तसेच ते अंतर्बाह्य जगतात भिन्नभिन्न भेद करणाऱ्या वृत्तीचे विलीन होणे याविषयीदेखील सांगतात. ते वर्णन करतात की,

अनंत ज्योतींचा एक किरणपुंज, चमचम करणाऱ्या चमकदार, अणूंपेक्षाही लहान, निळ्या, छोट्याछोट्या लखलखणाऱ्या ठिणग्या त्यांना सर्वांगामध्ये आणि बाहेरही दिसू लागल्या ज्या रिमझिम पावसाच्या कोमल शिडकाव्यात मिसळून जात होत्या. हे एक विलक्षण वर्णन आहे, अनेकत्वातील एकत्वाचे, त्या चितीचे जी सर्वव्यापी आहे; हे 'जोडाचे' म्हणजेच 'आंतरिक संबंधाचे' अद्वितीय वर्णन आहे. बाबांनी केलेले हे वर्णन आपल्याला सांगते की, 'जोड' किंवा 'आंतरिक संबंध' या विश्वब्रह्मांडाचे मूळ स्वरूपच आहे, हा 'जोड'च तो आधार आहे ज्यावर हे जगत प्रकट झाले आहे.

आपण जेव्हा बाबांच्या दिव्य दीक्षेविषयी त्यांचे शब्द वाचतो, तेव्हा ते शब्द, आपण आपली आध्यात्मिक साधना करत राहण्यासाठी आपल्याला प्रेरित करतात. तसेच, ते शब्द आपल्याला यासाठी मार्गदर्शन करतात की, आपण एका स्पष्ट समजूतीसह, एका नवीन दृष्टीकोनासह आपली साधना करावी, आपण हे समजून घ्यावे की, आपली साधना ही 'स्वतःला जोडून घेण्याचा' एक निरंतर प्रयत्नच आहे आणि तिचा मूळ उद्देशच आहे, 'जोडले जाणे'. 'सतत जोडलेले असणे' याच्या प्राप्तीसाठी आपण 'स्वतःला जोडून घेण्याचा' अभ्यास करतो.

* * *

या महिन्याच्या शेवटी, २६ ऑगस्टला जेव्हा पौर्णिमेचा चंद्र आकाशात असेल, तेव्हा आपण रक्षाबंधनाचा सण साजरा करू. या दिवशी, 'संबंध' किंवा 'नाते', विशेषतः एका ठोस रूपात व्यक्त होते, त्या रंगीबेरंगी राख्यांच्या रूपात, ज्या एकमेकांच्या मनगटांवर बांधल्या जातात. भारतात, बहीण आपल्या भावाच्या मनगटावर राखी बांधते, जी त्या दोघांमधील प्रेमाच्या व संरक्षणाच्या भावाचे प्रतीक असते. सिद्धयोग मार्गावर रक्षाबंधन हा सण गुरू व शिष्य यांच्या दरम्यान विद्यमान असणाऱ्या प्रेमाच्या व संरक्षणाच्या नात्याची अभिस्वीकृती करण्याचा व ते नाते दृढ करण्याचा दिवस असतो आणि त्याचबरोबर साधकांमधील परस्पर नात्याची अभिस्वीकृती करण्याचाही हा दिवस असतो.

एका धाग्यात, विशेषतः राखीमध्ये किती प्रतीकात्मकता आहे. धागा हा जोडतो, दोन गोष्टींना एकत्र सांधतो, तो वाहक असतो, तो दोन बिंदुंना एकमेकांशी जोडणारा सेतू असतो. आणि जर त्या रेशमी धाग्याच्या दोन टोकांना जोडून, २६ ऑगस्टच्या चंद्रासमान, पूर्ण गोलाकार बनवले तर काय होते? हा जोड, हा संबंध अंतहीन बनतो, तो अनंत बनतो आणि शाश्वतदेखील बनतो. श्रीगुरूंशी असलेल्या आपल्या संबंधाला तो अगदी परिपूर्णतेने दर्शवतो.

मी तुम्हाला प्रोत्साहित करेन की, तुम्ही ऑगस्ट महिन्यात जेव्हा ही पर्वे साजरी कराल आणि याचा शोध घेणे सुरू ठेवाल की 'जोड' किंवा 'नाते' याचा तुमच्यासाठी काय अर्थ आहे आणि तुमच्यासाठी

त्याचे काय महत्त्व आहे, तेव्हा सिद्धयोग मार्गाची वेबसाइट जरूर पाहा. ती एका निरंतर साधनसंपत्तीच्या रूपात तुम्हाला साहाय्य करेल. सुरुवातीला मी तुम्हाला बडे बाबांच्या गोष्टींविषयी सांगितले, त्यांची कृपा व त्यांचे दर्शन याविषयी सांगितले; हे सर्व या महिन्याच्या सुरुवातीला वेबसाइटवर प्रकाशित केले जाईल. 'चित्‌शक्ती विलास'मधून बाबांच्या शक्तिपाताचा अनुभव निश्चितच प्रकाशित केला जाईल व त्याचबरोबर त्यांच्या काही शिकवणीदेखील असतील. याशिवाय, गुरुमाईंच्या नववर्ष संदेशावर व्हीडिओच्या रूपात असलेल्या प्रवचन-शृंखलेचा पहिला भागही वेबसाइटवर प्रकाशित होईल. ही प्रवचने सन्माननीय व अनुभवी सिद्धयोग विद्यार्थ्यांद्वारे तसेच शिक्षकांद्वारे दिली जातील.

इतकेच नाही तर, २५ ऑगस्ट ते ९ सप्टेंबरपर्यंत 'एक मधुर सरप्राइझ्' सत्संग पुन्हा एकदा बेबसाइटवर उपलब्ध असेल. मी तुम्हाला प्रोत्साहित करते की, तुम्ही यामध्ये पुन्हा सहभागी व्हावे किंवा तुम्ही जर यापूर्वी सहभागी झाला नसाल, तर अवश्य सहभागी व्हावे; मी तुम्हाला यासाठीदेखील प्रोत्साहित करते की, तुम्ही गुरुमाईंच्या संदेश-प्रवचनातील शिकवणींचे अध्ययन व अभ्यास करण्यासाठी आपली वचनबद्धता टिकवून ठेवावी.

शिकवणींचे अध्ययन व अभ्यास यांच्याप्रति वचनबद्ध राहण्यासाठी मी तुम्हाला प्रोत्साहित करते आहे, कारण या शिकवणी सूर्यकिरणांप्रमाणे आहेत जी किरणे पावसाच्या वेळी, पाण्याने ओतप्रोत भरलेल्या ढगांना भेदतात, आणि त्यामुळे पावसाचे थेंब चमचमतात — याविषयी आपण आधी चर्चा केलीच आहे, त्यामुळे हे तर आतापर्यंत आपल्या लक्षात आलेलेच आहे की, किरणांमुळे पावसाचे थेंब कसे चमचमतात. आणि सूर्यप्रकाशाचे वैशिष्ट्य हे आहे की, त्याच्यामुळे ती चमक आणखीनच उठून दिसते.

आदरपूर्वक,

इशा सरदेसाई

---

[१] गणेशपुरी निवासी भगवान नित्यानंद, पृ. ६७.

[२] ज्ञानेश्वरी, १२.१; स्वामी कृपानंद, *Jnaneshwar's Gita: A Rendering of the Jnaneshwari* [ऑल्बनी, न्यूयॉर्क : SUNY Press, १९८९] पृ. १७५.

© २०१८ एस. वाय. डी. ए. फाउंडेशन®. सर्वाधिकार सुरक्षित.